PC-3 Data- D/Circular (vikas)

# मुंबई विद्यापीठ

No. Aff./ICC/ (2024-25)/ ३१ / of 2024

## परिपत्रक:

**विषय: भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सवी वर्षात दि. २६ नोव्हेंबर, २०२४ रोजी भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन करणेबाबत...**

संदर्भ:—१) शिक्षण संचालक, (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे क्र. उशिसं/मवि—१/परिपत्रक/२०२४/५०३४, दिनांक २२ नोव्हेंबर, २०२४.

२) उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे शासन परिपत्रक संकीर्ण—११२४/प्र.क्र. ७२/समन्वय दिनांक २२ नोव्हेंबर, २०२४

३) सामाजिक न्याय विशेष सहाय्य विभागाचा शासन निर्णय क्र. बीसीएच—२०/प्र. क्र.२४२५९२/शिक्षण, दि. १० ऑक्टोबर, २०२४

मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व शासकिय, अशासकिय, अनुदानित, विनाअनुदानित, कायमविनाअनुदानित महाविद्यालयांचे प्राचार्य, संस्थाचे संचालक यांना कळविण्यात येते की, दिनांक २६ नोव्हेंबर, १९४९ रोजी आपण संविधान स्वीकृत करून दि. २६ जानेवारी, १९५० पासून संविधानाची अंमलबजावणी सुरू झाली. भारतीय संविधानास ७५ वर्षे पुर्ण झाल्यानिमित्त सन २०२४—२५ या अमृत महोत्सवी वर्षात **''संविधान अमृत महोत्सव सन २०२४—२५''** साजरा करण्याबाबतचा निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या दिनांक १० ऑक्टोबर, २०२४ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला आहे.

भारतीय संविधानाचे तत्वज्ञान, मुल्य, आदर्श व संविधान निर्मितीचा उद्देश स्पष्ट करण्याकरिता संविधान प्रस्ताविक/ उद्देशिकेचे अनन्यसाधारण महत्व आहे. यास्तव भारतीय राज्यघटनेबाबत जागरूकता वाढविण्यासाठी भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सवी वर्षात दि. २६ नोव्हेंबर, २०२४ रोजी भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन करण्याचे आयोजन करण्यात यावे.

मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व शासकिय, अशासकिय, अनुदानित, विनाअनुदानित, कायमविनाअनुदानित महाविद्यालयांचे प्राचार्य, संस्थाचे संचालक यांनी **सर्व विद्यार्थ्यांच्या उपस्थितीतमध्ये दि. २६ नोव्हेंबर, २०२४ रोजी सकाळी ११.०० वा. भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहीक वाचन करण्याच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात यावे.** केलेल्या कार्यवाहीचा अहवाल विभागीय सहसंचालक यांना पाठविण्यात यावा.

ठिकाण : मुंबई—४०० ०३२
दिनांक : २५ नोव्हेंबर, २०२४

(डॉ. प्रसाद कारंडे)
कुलसचिव

मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व शासकिय, अशासकिय, अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित महाविद्यालयांचे प्राचार्य, संस्थाचे संचालक.

**महाराष्ट्र शासन**
**सहसंचालक**
**उच्च शिक्षण ,मुंबई विभाग , मुंबई**
**एलफिस्टन तंत्र विद्यालय आवार, ३ महापालिका मार्ग, मुंबई -४०० ००१**
www.jdhemumbai.gov.in Tel&Fax No. ०२२ २२६५६६००, २२६९१५२८

क्र.ससं/उशि/मुंवि/आस्था/२०२४/ दिनांक-२२.११.२०२४

प्रति,
प्राचार्य/संचालक/कुलसचिव,
सर्व शासकीय,अशासकीय अनुदानित/विनाअनुदानित
व कायम विनाअनुदानित कला,वाणिज्य,विज्ञान,विधी,
अध्यापक महाविद्यालये, अकृषि विद्यापीठे
मुंबई शहर व उपनगर

विषय-भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सवी वर्षात दिनांक २६ नोव्हेंबर २०२४ रोजी भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन करणेबाबत..
संदर्भ- मा.संचालनालयाचे परिपत्रक क्रमांक-उशिसं/मवि-१/परिपत्रक/२०२४/५०३४ दिनांक २२.११.२०२४

महोदय,

उपरोक्त संदर्भाधीन विषयाच्या अनुषंगाने दिनांक २६ नोव्हेंबर २०२४ रोजी संविधान अमृत महोत्सव सन २०२४-२५ साजरा करण्याबाबत शासन निर्देश आहेत. त्याअनुषंगाने भारतीय राज्यघटनेबाबत जागरुकता वाढविण्यासाठी भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सवी वर्षात दिनांक २६ नोव्हेंबर २०२४ रोजी सर्व विद्यार्थ्यांच्या उपस्थितीमध्ये भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामुहिक वाचन करण्याच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात यावे. तसेच आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमाचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.सोबत उपरोक्त संदर्भाधीन परिपत्रक जोडले आहे.

(डॉ.रुपेश राऊत)
सहसंचालक
उच्च शिक्षण,मुंबई विभाग,मुंबई

प्रत-माहितीकरीता सविनय सादर
मा.शिक्षण संचालक,उच्च शिक्षण,पुणे

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# महाराष्ट्र शासन

## शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण),

४१२ ई, बहिरट पाटील चौक, मॉडेल कॉलनी, शिवाजीनगर ४११०१६.

**Web :** www.dhepune .gov. in **E-Mail :mavi.** dhepune@gov.in

फोन नं.०२०/२६१२२१११९


क्र.: उशिसं/मवि-१/परिपत्रक/२०२४/ ५०३४ दिनांकः .२०२४ 22 NOV 2024

## परिपत्रक

**विषय : भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सवी वर्षात दि. २६ नोव्हेंबर २०२४ रोजी भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन करणेबाबत**

वाचा:१. उच्च व तंत्र शिक्षण विभागाचा शासन परिपत्रक क्र.: संकीर्ण ११२४/प्र.क्र.७२/समन्वय दि. २२.११.२०२४

२. सामाजिक न्याय विशेष सहाय्य विभागाचा शासन निर्णय क्र.: बीसीएच-२०/ प्र.क्र.२४२५९२/शिक्षण दि. १०.१०.२०२४

उपरोक्त विषयाबाबत संदर्भांकित पत्रांच्या प्रती सोबत जोडल्या आहेत, कृपया अवलोकनी घ्याव्यात.

दिनांक २६ नोव्हेंबर १९४९ रोजी आपण संविधान स्वीकृत करून दि. २६ जानेवारी, १९५० पासून संविधानाची अंमलबजावणी सुरु झाली. भारतीय संविधानास ७५ वर्षे पुर्ण झाल्यानिमित्त सन २०२४-२५ या अमृत महोत्सवी वर्षात **"संविधान अमृत महोत्सव सन २०२४-२५"** साजरा करण्याबाबतचा निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या दि. १० ऑक्टोबर, २०२४ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला आहे.

भारतीय संविधानाचे तत्वज्ञान, मुल्य, आदर्श व संविधान निर्मितीचा उद्देश स्पष्ट करण्याकरिता संविधान प्रास्ताविक/ उद्देशिकेचे अनन्यसाधारण महत्व आहे. यास्तव भारतीय राज्यघटनेबाबत जागरुकता वाढविण्यासाठी भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सवी वर्षात दि. २६ नोव्हेंबर २०२४ रोजी भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन करण्याचे आयोजन करण्यात यावे.

उच्च शिक्षण विभागांतर्गत असलेल्या **सर्व अकृषी/ अभिमत/ स्वयं अर्थसहाय्यित विद्यापीठे, सर्व संलग्नित शासकीय/ अशासकीय, अनुदानित महाविद्यालये व तत्सम शैक्षणिक संस्था यांचेकडून, सर्व विद्यार्थ्यांच्या उपस्थितीमध्ये दि. २६ नोव्हेंबर २०२४ रोजी सकाळी ११.०० वा. भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहीक वाचन करण्याच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात यावे.** केलेल्या कार्यवाहीचा अहवाल विभागीय सहसंचालक कार्यालयांनी संकलित करून एकत्रित स्वरूपात संचालनालयास सादर करावा.

**(डॉ. शैलेंद्र देवळाणकर)**
शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे -१६.

प्रति,

१. सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य.
२. कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे/अभिमत विद्यापीठे /स्वयंअर्थसहायित विद्यापीठे महाराष्ट्र राज्य.
३. प्राचार्य/संचालक, सर्व शासकीय/अशासकीय महाविद्यालये/संस्था.

भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सवी वर्षात दिनांक २६ नोव्हेंबर, २०२४ रोजी भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
**शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण ११२४/प्र.क्र.७२/समन्वय**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक - २२ नोव्हेंबर, २०२४

वाचा :- सामाजिक न्याय विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय क्र. बीसीएच-२० प्र.क्र.२४२५९२/ शिक्षण, दिनांक १० ऑक्टोंबर, २०२४

परिपत्रक

दिनांक २६ नोव्हेंबर, १९४९ रोजी आपण संविधान स्वीकृत करुन दिनांक २६ जानेवारी, १९५० पासून संविधानाची अंमलबजावणी सुरु झाली. भारतीय संविधानास ७५ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त सन २०२४-२५ या अमृत महोत्सवी वर्षात संविधान अमृत महोत्सव सन २०२४-२५ साजरा करण्याबाबतचा निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या दिनांक १० ऑक्टोबर, २०२४ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला आहे.

भारताच्या संविधानाचे तत्वज्ञान, मूल्य, आदर्श व संविधान निर्मितीचा उद्देश स्पष्ट करण्याकरिता संविधान प्रास्ताविक/उद्देशिकेचे अनन्यसाधारण महत्व आहे. यास्तव भारतीय राज्यघटनेबाबत जागरुकता तसेच घटनात्मक अधिकार व कर्तव्याबाबत विद्यार्थी व नागरिकांमध्ये जागरुकता वाढविण्यासाठी भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सवी वर्षात दिनांक २६ नोव्हेंबर, २०२४ रोजी भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन करण्याचे आयोजन करण्यात यावे.

१) उच्च व तंत्र शिक्षण विभागाअंतर्गत सर्व विद्यापीठे, अभिमत विद्यापीठे, स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे, संलग्नित महाविद्यालये, तत्सम शैक्षणिक संस्थामध्ये, सर्व विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत दिनांक २६ नाव्हेंबर, २०२४ रोजी सकाळी ११.०० वा. भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन करण्याबाबत आयोजन करण्यात यावे.

या उपक्रमाबाबत सर्व विद्यापीठांनी संलग्नित महाविद्यालयांना आवश्यक सूचना द्याव्यात.

२) शासकीय ग्रंथालयातील जिल्हा ग्रंथालय अधिकारी/ग्रंथपाल व सार्वजनिक ग्रंथालयांमध्ये अध्यक्ष/सचिव यांच्या उपस्थितीत वाचक/सभासदांसह भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे वरील वेळेत वाचन करावे.

३) सदर उपक्रमाची अंमलबजावणी प्रभावीपणे होईल याबाबत सर्व विद्यापीठे, संचालक, उच्च शिक्षण/ तंत्र शिक्षण/ कला / ग्रंथालय यांनी आवश्यक दक्षता घ्यावी.

संविधान अमृत महोत्सव सन २०२४-२५ अंतर्गत आयोजित करण्यात येणाऱ्या अन्य उपक्रमांबाबत स्वतंत्रपणे कळविण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

(अ. शा. मुत्याल)
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत -

१. मा.राज्यपाल तथा कुलपती यांचे प्रधान सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
२. मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
४. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
५. संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे
६. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई
७. संचालक, कला संचालनालय, मुंबई
८. संचालक, ग्रंथालय संचालनालय, मुंबई
९. कुलसचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अधिनस्त सर्व विद्यापीठे, अभिमत विद्यापीठे, स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे.
१०.उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अधिनस्त विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालये (उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अधिनस्त विद्यापीठांचे कुलसचिव यांच्यामार्फत)
११.सर्व सह सचिव/ उप सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
१२. राज्य संपर्क अधिकारी, रासेयो कक्ष, उच्च व तंत्र शिक्षण, मंत्रालय, मुंबई
१३. निवड नस्ती

भारतीय संविधानास ७५ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त संविधान अमृत महोत्सव सन २०२४-२५ पासून "घर घर संविधान" कार्यक्रम साजरा करणेबाबत...

**महाराष्ट्र शासन**
**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग**
**शासन निर्णय क्रमांक: बीसीएच-२०.क्र.प्र/२४२५९२-शिक्षण/**
**मंत्रालय विस्तार ,मुंबई-४०० ०३२**
**दिनांक: १० ऑक्टोबर ,२०२४**

**प्रस्तावना :-**

दिनांक २६ नोव्हेंबर,१९४९ रोजी आपण संविधान स्वीकृत करुन दिनांक २६ जानेवारी, १९५० पासून संविधानाची अंमलबजावणी सुरु झाली. संविधानाचे महत्व अनेक स्तरांवर असुन भारतीय संविधानात समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही, गणराज्य घडविण्याचा व नागरिकांना सामाजिक, आर्थिक आणि राजनैतिक न्याय, विचार, अभिव्यक्ति, विश्वास, श्रद्धा व उपासना यांचे स्वातंत्र्य, तसेच दर्जा व संधीची समानता प्राप्त करून देण्याचा आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तिची प्रतिष्ठा व राष्ट्राची एकता व एकात्मता, बंधुता या मूल्यांचा विचार केलेला आहे. संविधान हे एक जिवंत दस्तऐवज आहे जे देशाच्या विकासात आणि नागरिकांच्या जीवनाच्या गुणवत्तेत महत्वपूर्ण भूमिका बजावते.

२. भारतीय राज्यघटनेबाबत जागरूकता, तसेच संविधानाची मुल्ये शालेय, महाविद्यालयीन विद्यार्थी तसेच देशाचे भावी नागरिक यांच्यापर्यंत पोहचावीत यासाठी राज्यातील प्राथमिक व माध्यमिक शाळा, सर्व प्रकारची व्यावसायिक/ बिगर व्यावसायिक महाविद्यालये, शैक्षणिक संकुले, शासकीय वसतिगृहे व शासकीय निवासी शाळा, शासन मान्यता प्राप्त अनुदानित/ विनाअनुदानित/ स्वयं अर्थसहाय्यित शाळा/ आश्रमशाळा व वसतिगृहे तसेच ग्रामीण व नागरी स्वराज्य संस्था, महाराष्ट्र विधानपरिषद/विधानसभा अशा सर्व ठिकाणी भारतीय संविधानास ७५ वर्ष पुर्ण झाल्याानिमित्त सन २०२४-२५ या अमृतमहोत्सवी वर्षात संविधान अमृत महोत्सव सन २०२४-२५ **"घर घर संविधान"** साजरा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

राज्यातील प्राथमिक व माध्यमिक शाळा, सर्व प्रकारची व्यावसायिक/बिगर व्यावसायिक महाविद्यालये, शैक्षणिक संकुले, शासकीय वसतिगृहे व शासकीय निवासी शाळा, शासन मान्यता प्राप्त अनुदानित/ विनाअनुदानित/ स्वयंअर्थसहाय्यित शाळा/ आश्रमशाळा व वसतिगृहे, ग्रामीण व नागरी स्वराज्य संस्था तसेच महाराष्ट्र विधानपरिषद/विधानसभा अशा सर्व ठिकाणी भारतीय राज्यघटनेबाबत जागरूकता, तसेच घटनात्मक अधिकार व कर्तव्यांबदल सर्व नागरिकांमध्ये जागरुकता वाढविण्यासाठी संविधान अमृत महोत्सव सन २०२४-२५ **"घर घर संविधान"** साजरा करण्याचा उद्देश खालीलप्रमाणे आहे:-

१. **संविधानाची जागरूकता:-**

संविधानाचे महत्व, त्यातील मूल्ये आणि त्याची अंमलबजावणी याबाबत शालेय आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये तसेच भावी नागरिकांमध्ये जागरूकता वाढवणे.

२. **शिक्षण:-**

संविधानातील मूलभूत हक्क, कर्तव्ये, आणि विविध तरतुदींचे शिक्षण देणे, ज्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रीय एकात्मता आणि सामाजिक न्यायाची भावना रुजवणे.

३. **मूल्यसंस्कार:-**

भारतीय संविधानातील समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही मूल्यांचा प्रचार व प्रसार करणे, ज्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये विविधतेतून एकता आणि समता या संकल्पनांचा विकास होईल.

४. **सक्रिय सहभाग:-**

विद्यार्थ्यांना संविधानाच्या अध्ययनामुळे आणि चर्चेद्वारे त्यांच्या सामाजिक, आर्थिक आणि राजकीय अधिकारांची जाणीव करून देणे आणि त्यांच्या जबाबदा-यांचे पालन करण्यासाठी प्रेरित करणे.

५. **राष्ट्रीय एकात्मता:-**

व्यक्तिची प्रतिष्ठा व राष्ट्राची एकता व एकात्मता, बंधुता या मूल्यांचा प्रचार व प्रसार करणे, ज्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रीय एकात्मतेची भावना बळकट होईल.

२. राज्यातील प्राथमिक व माध्यमिक शाळा, सर्व प्रकारची व्यावसायिक/ बिगर व्यावसायिक महाविद्यालये, शैक्षणिक संकुले, शासकीय व अनुदानित वसतिगृहे व शासकीय निवासी शाळा, शासन मान्यता प्राप्त अनुदानित/ विनाअनुदानित/ स्वयंअर्थसहाय्यित शाळा/ आश्रमशाळा व वसतिगृहे ग्रामीण व नागरी स्वराज्य संस्था व महाराष्ट्र विधानपरिषद/विधानसभा अशा सर्व ठिकाणी भारतीय राज्यघटनेबाबत जागरूकता, तसेच उपेक्षित समुदायांमध्ये घटनात्मक अधिकार व कर्तव्यांबदल जागरुकता वाढविण्यासाठी संविधान अमृत महोत्सव २०२४-२५ “घर घर संविधान” साजरा करण्याच्या अनुषंगाने खालील कार्यक्रमांचे आयोजन करण्यात यावे.

**संविधान अमृत महोत्सव २०२४-२५ “घर घर संविधान” अंतर्गत घ्यावयाचे स्पर्धा / उपक्रम :-**

| क्रमांक | उपक्रम | संबंधित यंत्रणा |
|---|---|---|
| अ | **प्राथमिक व माध्यमिक शाळा, सर्व प्रकारची व्यावसायिक/ बिगर व्यावसायिक महाविद्यालये, शैक्षणिक संकुले, शासकीय वसतिगृहे व शासकीय निवासी शाळा, शासन मान्यता प्राप्त अनुदानित/ विनाअनुदानित/ स्वयंअर्थसहाय्यित शाळा/ आश्रमशाळा व वसतिगृहे.** | |
| | १. शाळा/महाविद्यालय/ वसतिगृहे यांच्या दर्शनी भागात संविधानाची उद्देशिका लावणे | **संबंधित सर्व विभाग** |
| | २. शालेय परिपाठात तसेच वसतिगृह प्रार्थनेत दररोज संविधान प्रास्ताविका/उद्देशिकचे वाचन विद्यार्थ्यांकडून करवून घेणे. | |
| | ३. शालेय वाचनालयात संविधानाच्या किमान पाच प्रती विद्यार्थ्यांना वाचनासाठी उपलब्ध करवून देणे | |
| | ४. भारतीय संविधान बाबत सर्वसाधारण माहिती देणे, जसे, निर्मिती, निर्मिती समिती, अनुच्छेद, विशेषता, कर्तव्ये यावर व्याख्यान (किमान ६० ते ९० मिनिटे) | |

| | | |
|---|---|---|
| | ५. विद्यार्थ्यांना भारतीय संविधानातील प्रमुख प्रकरणे, हक्क, आणि कर्तव्ये यांवर मार्गदर्शन करणे | |
| | ६. कार्यशाळांद्वारे विद्यार्थ्यांना संविधानाचे तत्त्वज्ञान आणि मूल्ये समजावून सांगणे. | |
| | ७. संविधान मुल्ये यावर पथनाट्य तयार करणे | |
| | ८. शाळा/महाविद्यालयात संविधानाच्या विविध मुद्यांवर फलक, पोस्टर, आणि प्रदर्शन आयोजित करणे | |
| | ९. संविधान दिन कार्यक्रम आयोजित करणे, ज्यात पथनाट्य आणि पोस्टर प्रदर्शन याचा समावेश करावा. | |
| | १०.संविधानावर आधारित निबंध लेखन, भाषण, वादविवाद, चित्रकला स्पर्धा इत्यादी उपक्रमांचे आयोजन करणे. | |
| | ११.प्रजासत्ताक दिनी संविधानातील मुल्यांवर आधारित सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन व सादरीकरण. (जसे देशभक्तिपर गाणी, नाटक, आणि नृत्य) | |
| ब | **ग्रामीण व नागरी स्वराज्य संस्था** | |
| | ग्रामीण व नागरी स्वराज्य संस्थाच्या वेळोवेळी होणाऱ्या वार्षिक सर्वसाधारण सभा, मासिक सभा, ग्रामसभा इत्यादी सभांची सुरूवात भारतीय संविधान प्रास्ताविकेच्या वाचनाने करावी. | ग्राम विकास विभाग /नगर विकास विभाग |
| क | **महाराष्ट्र विधानपरिषद/ विधानसभा** | |
| | महाराष्ट्र विधानपरिषद/ विधानसभा यांच्या सत्रांची सुरूवात भारतीय संविधान प्रास्ताविकेच्या वाचनाने करावी यासंदर्भात संसदीय कार्ये विभागाने मार्गदर्शक सूचना निर्गमित कराव्यात. | **संसदीय कार्ये विभाग** |
| ड | **संविधान संमेलन** | |
| | राज्यातील ३६ जिल्ह्यांमध्ये संविधानाचे प्रबोधन होण्याकरिता संविधान संमेलनाचे आयोजन करावे. | **संबंधित सर्व जिल्हाधिकारी** |

३. राज्यातील प्राथमिक व माध्यमिक शाळा, सर्व प्रकारची व्यावसायिक/ बिगर व्यावसायिक महाविद्यालये, शैक्षणिक संकुले, शासकीय वसतिगृहे व शासकीय निवासी शाळा, शासन मान्यता प्राप्त अनुदानित/ विनाअनुदानित/ स्वयंअर्थसहाय्यित शाळा/ आश्रमशाळा व वसतिगृहे तसेच ग्रामीण व नागरी स्वराज्य संस्था, महाराष्ट्र विधानपरिषद/विधानसभा अशा सर्व ठिकाणी भारतीय राज्यघटनेबाबत जागरूकता निर्माण व्हावी. तसेच भारतीय संविधानाच्या मुलभुत तत्वांची माहिती समाजातील उपेक्षित घटकास व्हावी यासाठी सदर कार्यक्रमाची रुपरेषा निश्चित करुन कार्यक्रमाच्या अंमलबजावणीबाबत मार्गदर्शन व सल्ला देण्याच्या अनुषंगाने मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली खालीलप्रमाणे **राज्यस्तरीय घर घर संविधान समिती** स्थापन करण्यात येत आहे.

| अ.क्र. | पदनाम विभाग | पदनाम |
|---|---|---|
| १. | मुख्य सचिव,महाराष्ट्र राज्य | अध्यक्ष |
| २. | प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ३. | प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग | सदस्य |
| ४. | प्रधान सचिव, इतर मागास व बहुजन कल्याण विभाग | सदस्य |
| ५. | प्रधान सचिव,ग्रामविकास विभाग | सदस्य |
| ६ | प्रधान सचिव,नगरविकास विभाग | सदस्य |
| ७. | सचिव, आदिवासी विकास विभाग | सदस्य |
| ८. | सचिव, दिव्यांग कल्याण विभाग | सदस्य |
| ९. | सचिव,महिला व बालविकास विभाग | सदस्य |
| १०. | सचिव,अल्पसंख्यांक विकास विभाग | सदस्य |
| ११. | सचिव,संसदीय कार्ये विभाग | सदस्य |
| १२. | सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग | सदस्य सचिव |

उपरोक्त गठीत राज्यस्तर घर घर संविधान समितीमार्फत जिल्हास्तरावरील समित्यांकडून आयोजित करण्यात येणाऱ्या संविधान कार्यक्रमांबाबत नियमितपणे आढावा घेण्यात येईल.

४. घर घर संविधान कार्यक्रम जिल्हास्तरावर राबविण्यासाठी जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली खालीलप्रमाणे **जिल्हास्तरीय समिती** स्थापन करण्यात येत आहे:-

| अ.क्र. | पदनाम विभाग | पदनाम |
|---|---|---|
| १. | जिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| २. | मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद | सदस्य |
| ३. | सर्व मुख्याधिकारी,नगरपंचायत/नगरपरिषद/ नगरपालिका | सदस्य |
| ४. | शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद | सदस्य |
| ५. | महिला व बालविकास अधिकारी, जिल्हा परिषद | सदस्य |
| ६ | सहाय्यक आयुक्त,समाजकल्याण, | सदस्य |
| ७. | निवासी उपजिल्हाधिकारी, | सदस्य सचिव |

- जिल्हास्तरीय समितीमार्फत राबविण्यात येणाऱ्या घर घर संविधान या कार्यक्रमांची अंमलबजावणी, देखरेख व संनियंत्रण करण्यासाठी जिल्ह्यातील इतर आवश्यक अधिकारी यांचा समितीमधील सदस्य प्रतिनिधी म्हणून समावेश संबंधित जिल्हाधिकारी यांनी आपल्या स्तरावर करावा.

**जिल्हास्तरीय समितीची कार्यकक्षा खालीलप्रमाणे राहील:-**

- संविधान मंचाच्या कार्याची वार्षिक योजना तयार करणे, ज्यामध्ये विविध उपक्रम, कार्यक्रम, चर्चा सत्रे, आणि स्पर्धा आयोजित करण्याचे नियोजन करणे.
- संविधान दिन (२६ नोव्हेंबर) आणि प्रजासत्ताक दिन (२६ जानेवारी) यासारख्या महत्वाच्या तारखावर तसेच महिनावार वेळापत्रक आखून विशेष कार्यक्रम आयोजित करणे.
- सदर समितीने उपरोक्त मार्गदर्शक सूचनांव्यतिरिक्त आपल्या स्तरावरून नावीन्यपूर्ण उपक्रमांचा समावेश करून अधिक चांगल्या रीतीने कार्यक्रमांची अंमलबजावणी करावी.
- संविधान अमृत महोत्सव २०२४-२५ "घर घर संविधान" हा कार्यक्रम २६ नोव्हेंबर, २०२४ पासून साजरा करावा.

५.   संविधान अमृत महोत्सव सन २०२४-२५ “घर घर संविधान” हा कार्यक्रम दि.२६ नोव्हेंबर, २०२४ पासून पुढील प्रत्येक वर्षी सर्व जिल्ह्यांमध्ये राबविण्याकरिता संबंधित जिल्हाधिकारी यांनी सदर कार्यक्रमाचे वार्षिक वेळापत्रक तयार करून अंमलबजावणी करावी. तसेच संबंधित जिल्ह्यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले असल्याची खात्री व सनियंत्रण संबंधित विभागीय आयुक्त यांनी करावे. या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने मुल्यमापन करून त्याबाबतची नोंद संबंधित जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद व विभागीय आयुक्त, यांच्या वार्षिक मुल्यांकन अहवालात घेण्यात यावी.

६.   सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२४१०१०१९०८११९३२२ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकीत करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

VIJAY BALKRISHNA WAGHMARE

Digitally signed by VIJAY BALKRISHNA WAGHMARE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=TRIBAL DEVELOPMENT DEPARTMENT,
2.5.4.20=f732949950f551f77488d97adf63b1be835f3a8db6f43554c249546fe680b629, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=46023E62FC39A04680C22E8800D4B44643940A8C497578686120DE5067362274, cn=VIJAY BALKRISHNA WAGHMARE
Date: 2024.10.10 18:55:02 +05'30'

**( विजय वाघमारे )**

**सचिव,महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. मा.उपमुख्यमंत्री (गृह), यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई,
४. मा.उपमुख्यमंत्री (वित्त व नियोजन), यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई,
५. सर्व मा. मंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
६. मा.विरोधी पक्षनेते,महाराष्ट्र विधानपरिषद/विधानसभा,विधानभवन मुंबई,
७. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय,मुंबई,
८. सर्व सचिव/प्रधान सचिव/अ.मु.स, सर्व मंत्रालयीन विभाग,
९. सर्व विभागीय आयुक्त,सर्व विभाग,
१०.सर्व जिल्हाधिकारी,
११.सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद,
१२.निवडनस्ती, शिक्षण-२